# नाविन्यपूर्ण उपक्रम (Best Practices)

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी यासाठी इतिहास विभागाकडून खालील नावीन्यपूर्ण उपक्रम (Best Practices) राबविले जातात.

## शैक्षणिक वर्ष : 2022-23

### उपक्रमाचे नाव : शाहूवाडी तालुक्यातील गौरी - गणपतीच्या गाण्यांचे संकलन

इतिहास लेखन व आधुनिक संदर्भ साधनांचे क्षेत्र अधिक विस्तारत आहे.इतिहास लेखनात नवनवीन विचार प्रवाहांचा अंतर्भाव झालेला आहे. या नवीन विचार प्रवाहांनी नव्याने ऐतिहासिक साधनांचे महत्त्व, चिकित्सा, विश्लेषण अथवा प्रचलित साधनांचा नव्या पद्धतीने वापर करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये मौखिक परंपरा आणि साधनांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. मौखिक साधने ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने हस्तांतरित केली जातात. ती लिखित स्वरूपात नसतात त्यामुळे ती नामशेष होण्याची शक्यता अधिक असते. म्हणून मौखिक साधनांचे संकलन व जतन करणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने इतिहास विभागाने (श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड) शाहुवाडी तालुक्यातील गौरी - गणपतीच्या गाण्यांचे संकलन करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला. या उपक्रमाच्या माध्यमातून गौरी - गणपतीच्या गाण्यांचे संकलन तर झालेच त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मुलाखत तंत्र व ऐतिहासिक तथ्य संकलनाचे तंत्रही माहिती होण्यास मदत झाली.

## शैक्षणिक वर्ष : 2021-22

### उपक्रमाचे नाव : अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांचा चरित्रकोश

शिवाजी विद्यापीठाच्या **शिव-वाणी** या युट्युब वाहिनीवरून **'आजादी का अमृत महोत्सव'** या उपक्रमांतर्गत 15 ऑगस्ट 2022 पासून सुरू असलेल्या 'अभिवादन स्वातंत्र सैनिकांना' या ध्वनी मालिकेसाठी इतिहास विभागाने (श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूड) शाहूवाडी तालुक्यातील सरूड गावातील  श्री रंगराव नामदेव पाटील, श्री ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप, श्री हिंदुराव हैबती टेके या अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांचा शोध घेऊन त्यांचे कार्य समाजापुढे आणण्याचा प्रयत्न केला. या नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील सदस्यांच्या व संबंधित अन्य व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. त्याचबरोबर अन्य लिखित साधनांचा शोध घेऊन त्याच्या आधारे सदर उपक्रम पूर्ण केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मुलाखत तंत्राची माहिती होऊन त्यांच्यामध्ये इतिहास संशोधनाबद्दल अभिरुची निर्माण होण्यास मदत झाली.